# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.10.2025 वार- सोमवार**

---

**भांडारकरकरार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या महिन्यात उद्धाटन केलेल्या “ज्ञान-भारतम्” मिशनशी पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचा सामंजस्य करार नुकताच झाला. हा करार पाच वर्षांचा असून त्याद्वारे भांडारकर संस्थेला ज्ञान-भारतम् मिशनमध्ये क्लस्टर सेंटरचा दर्जा देण्यात आला आहे. संस्थेच्या स्वतःच्या संग्रहाबरोबरच इतर संस्था आणि व्यक्तींच्या संग्रहांमधील हस्तलिखितांची नोंदणी, जतन, डिजिटायझेशन, भाषांतर, प्रकाशन आणि हस्तलिखितांवरील संशोधन अशा विविध बाबींची जबाबदारी या कराराद्वारे भांडारकर संस्थेवर सोपवण्यात आली आहे. संस्कृति-मंत्रालयाच्या वतीने सहसचिव समर नंदा आणि भांडारकर संस्थेच्या वतीने नियामक परिषदेचे सदस्य मनोज एरंडे यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. संस्थेचे निबंधक डॉ. श्रीनन्द बापट यावेळी उपस्थित होते.

**वन्देमातरम्**

बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी लिहिलेल्या वन्दे मातरम् या राष्ट्रमंत्राच्या निर्मितीला येत्या ३१ ऑक्टोबरला, तिथीनुसार कार्तिक शुद्ध नवमीला दीडशे वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने पुण्यात ‘वन्दे मातरम्’ गौरव महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या महोत्सवाचं उद्धाटन बंकिमचंद्र यांचे वंशज पार्थ चॅटर्जी यांच्या हस्ते होणार आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी महाविद्यालय, वन्दे मातरम् सार्ध शती

जयंती समारोह समिती, पाञ्चजन्य फाउंडेशन आणि जन्मदा प्रतिष्ठान या संस्थांनी संयुक्तपणे या कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे.

**<u>ज्येष्ठनागरिक</u>**

जागतिक जेष्ठ नागरिक दिनानिमित्त येत्या शुक्रवारी पुण्यात जेष्ठांचा आनंद मेळावा होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या आनंद मेळाव्याचं उद्घाटन होईल. पुणे आणि पिपरी चिंचवड महानगरपालिका, जनसेवा फौंडेशन आणि पुणे जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील सुमारे शंभर ज्येष्ठ नागरिक संघटनांनी गणेश कला क्रीडा मंच इथं या मेळाव्याचं आयोजन केलं आहे.

**<u>जैनबोर्डिंग</u>**

पुण्यातील बांधकाम व्यावसायिक विशाल गोखले यांनी जैन बोर्डिंग हाऊसबरोबरचा जागेचा व्यवहार रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंबंधी त्यांनी ईमेलवरून ट्रस्टला माहिती दिली असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. माजी आमदार रवींद्र धंगेकर आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी या प्रकरणी आक्रमक भूमिका घेतली होती. यानंतर केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी जैन मुनींची भेट घेत, आपण या प्रकरणी जैन समाजाबरोबर असल्याचं सांगितलं होतं.

**<u>मोर्चा</u>**

महायुती सरकार आणि झोपडपट्टी पुनर्वसन विभागाचा कारभार भ्रष्ट आणि बिल्डरधार्जिणा असल्याचा आरोप करत वंचित बहुजन आघाडीनं आज पुण्यात धडक मोर्चा काढला. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी या मोर्चाचं नेतृत्व केलं. यानंतर आंबेडकर यांनी विभागातील अधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

**<u>कार्तिकीयात्रा</u>**

कार्तिकी एकादशीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांच्या सोयीकरता एसटी महामंडळानं राज्यभरातून १ हजार १५० अतिरिक्त बस सोडण्याचं नियोजन केलं आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली.

**<u>रक्ततुटवडा</u>**

पुण्यातील रक्तपेढ्यांमध्ये सध्या रक्ताचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे अनेक रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागत आहेत. बहुतांश रक्तपेढ्यांकडे केवळ चार-पाच दिवस पुरेल इतकाच साठा आहे. त्यामुळे नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन रक्तपेढ्यांमध्ये रक्तदान करावं असं आवाहन रक्तपेढ्या आणि स्वयंसेवी संस्थांनी केलं आहे.

**<u>कृषिमंत्री</u>**

कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण कल्पना आणि शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करण्याची गरज आहे, असं प्रतिपादन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलं आहे. इंदापूर इथं कृषी पदवीधर संघाने आयोजित केलेल्या मेळाव्यात ते बोलत होते.

**<u>रस्ताबंद</u>**

हडपसर ते दिवेघाट दरम्यान रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी उद्या सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत वाहतूक बंद राहणार आहे. त्यामुळे वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा असं राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणानं कळवलं आहे.

**<u>चार्जिंगस्टेशन</u>**

पिंपरी चिंचवड महापालिका इलेक्ट्रिक वाहनांसाठी खाजगी संस्थेच्या माध्यमातून 22 ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारणार आहे. स्वतः बांधा आणि संचलित करा या अटीवर ही चार्जिंग स्टेशन्स उभारली जाणार आहेत. यासाठी महापालिका खाजगी संस्थेला जागा उपलब्ध करून देणार आहे.

**दक्षता**

प्रसारभारतीच्यावतीने आजपासून 2 नोव्हेंबर पर्यंत दक्षता आणि जागरूकता सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त आज पुणे आकाशवाणी केंद्रातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी देशाप्रती सत्यनिष्ठेची सामुहिक शपथ घेतली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज हलका पाऊस पडला. कमाल तापमान ३१ तर किमान तापमान २१ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**